# उघड्या डोळ्यांनी बघायचे तर....

डॉ. नरेंद्र दाभोलकर

जागांबाबतची सवर्ण-पोटदुखी आता
चित आहे. ज्ञानाच्या क्षेत्रामधे ऐति-
परंपरेने पुढे असलेल्या ब्राह्मणी
तर हा भलताच अन्याय वाटतो.
खरे अल्पसंख्य आणि दलित, पण
आड येते ना? अशी मतलबी मळमळ
बैठकांतून आणि प्रसंगानुरूप जाहीर-
ताना ही मंडळी नेहमीच आढळतात.
रड्याओरड्यातला दांभिकपणा या
कोणत्याही आकडेवारीवर नजर
तरी स्पष्ट होतो. दलितांसाठी
या राखीव जागा आणि त्याची
रिक पूर्तता याची दरी नेहमीच या
वरून समजते. या बाजूच्या दुसऱ्या
विचार करणे फारसे शिष्टसंमत
ने ते बहुधा टाळले जाते. परंतु सव-
बत सवर्ण ब्राह्मणी अहंकार बघता
बत आता हा सूर्य आणि हा जयद्रथ
खवणे गरजेचे झाले आहे.

जू आहे ब्राह्मणांनी अत्यंत पद्धतशीरपणे
वलेल्या सार्वजनिक संस्थांची. संपूर्णपणे
निक स्वरूपाच्या या संस्थांचे पंचाहत्तर
भर वर्षातील कार्यकारी मंडळाचे सर्व
द अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्य-
आजीव सदस्य ही जर ब्राह्मण मंडळी
च वेळा एकाच पोटशाखेतील) अस-
तर हे वर्चस्व नैसर्गिक मानायचे
? त्याच्याविरुद्ध आवाज उठवावयास
काय?

दाखल अशी दोन उदाहरणे देत आहे:
रा शहराचे नगरवाचनालय आपला
त्तर रौप्य महोत्सव (१२५ वर्षे पूर्ण)
र्षी साजरा करत आहे. महाराष्ट्रातले
रा क्रमांकाचे हे जुने वाचनालय. (पहिले
कचे, दुसरे पुण्याचे) १८५३ साली
स्थेची स्थापना झाली. मूळ छत्रपती
सिंह महाराज भोसले–सातारच्या
वारस यांची यामागची मूळ प्रेरणा.
स्वतःचे ग्रंथसंग्रहालय चालू केले.
मृत्यूनंतर त्यांचे भाऊ शहाजी ऊर्फ
साहेब यांनी त्याची जोपासना केली.
अप्पासाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी सगुणाबाई यांनी इमारतीसह हे वाचनालय सार्वजनिक केले. १९४९ सालानंतर तर या नगरवाचनालयाचे रूपांतर जिल्हा वाचनालयात झाले.

आता या नगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाची जी माहिती स्मरणिकेत प्रसिद्ध झाली आहे, त्याप्रमाणे या वाचनालयाचे सर्व अध्यक्ष ब्राह्मण आहेत. सव्वीसपैकी चोवीस उपाध्यक्ष ब्राह्मण आहेत. (गेल्या दोन वर्षांत दोन ब्राह्मणेतर उपाध्यक्ष घेतले त्यांपैकी एक जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष असून दुसरे त्याच बँकेचे मॅनेजर आहेत. निधी संकलनाचा हेतू यामागे असावा.) सर्व

## समता संगर

कार्याध्यक्ष अर्थातच ब्राह्मण. सर्वच्या सर्व एकोणतीस कार्यवाह ब्राह्मण. त्रेपन्न आजीव सदस्यांपैकी एखादा अपवाद वगळता सर्व ब्राह्मण. पंचवीस वर्षांहून जास्त काळ सभासद असलेले सर्व ब्राह्मण. कळस म्हणजे माजी कार्यकारिणीच्या एकशेदहा सभासदांपैकी सर्वच्या सर्व ब्राह्मण. विद्यमान शतकोत्तर रौप्य महोत्सव समिती ही सर्वच्या सर्व ब्राह्मणी असणार हे ओघाने आलेच.

सातारा शहर व जिल्हा हा बहुजन समाजाचा आहे. या १२५ वर्षांत लाखाहून अधिक लोक नगरवाचनालयाचे सभासद होऊन गेले असतील. निवडणुका नियमितपणे होतातच. या सर्वांमधेही हे वर्चस्व व स्वरूप सतत टिकवण्यासाठी अक्कलहुशारी लागणारच. या सर्व कालावधीमध्ये औषधाला एकही मागासवर्गीय आणि औषधापुरताच एखादा बहुजन समाजातला माणूस जिल्ह्याच्या सांस्कृतिक व्यापाराचे नियंत्रण करण्याच्या या प्रक्रियेत सहभागी व्हावा. हे कशाचे लक्षण आहे?

दुसरे उदाहरण तर फारच मोठ्या संस्थेचे आहे. हिंगणे स्त्री–शिक्षण संस्थेला आज स्थापना होऊन ब्याऐंशी वर्षे पूर्ण झाली. अतिशय मूलभूत सामाजिक कार्याकरता संस्था स्थापन झाली आणि ते कामही ती निष्ठेने करत आहे परंतु सर्व समाजाच्या या कामाची धुरा ही फक्त एकाच जातीची मंडळी सतत सांभाळतात हे सामाजिक निरोगतेचे लक्षण मानायचे काय? संस्थेचे सध्याचे सर्व उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्योपाध्यक्ष, विश्वस्त, सल्लागार, इंजीनिअर, वैद्यकीय सल्लागार, कायद्याचे सल्लागार, हिशेबतपासनीस हे सर्व फक्त ब्राह्मणातलेच मिळावेत हा केवळ योगायोग मानावा काय? सध्या काम करत असलेल्या आणि निवृत्त झालेल्या सर्व आजन्म सेविका ब्राम्हणच असाव्यात हे कसे? अन्य समाजांतील लायक सेवापरायण महिला उपलब्धच नसतील काय? नियामक मंडळाचे सर्व सभासद मान्यवर प्रतिष्ठित ब्राम्हणच. पार्वतीबाई अध्यापिका विद्यालय, महिलाश्रम हायस्कूल, आनंदीबाई कर्वे, प्राथमिक शाळा या सर्वांची संयुक्त शाळा समिती; चिटणीस कचेरी, महिलाश्रम वसतिगृह, व महिला निवास या सर्वांची कार्यकारी मंडळे; पुणे शाखा कन्याशाळा सातारा, कन्याशाळा वाई या सर्वांच्या शाळासमित्या सल्लागार इंजीनिअर, वैद्यकीय सल्लागार हे सर्व पूर्ण स्वरूपात ब्राह्मणाचे. एका क्षेत्रात समाजपरिवर्तनाचे क्रांतिकारक पाऊल उचलणाऱ्या संस्थेने दुसऱ्या क्षेत्रात त्या विचारवाटेला सोडचिठ्ठीची द्यावी काय?

हे सारे लिहिणे काही जणांना औचित्याला सोडून वाटेल परंतु या सर्वाचा संबंध सामाजिक न्याय आणि कठोर वास्तव याच्याशी जर आपण जोडू शकत असू आणि उघड्या डोळ्यांनी विचार करावयास तयार असू तर औचित्य–अनौचित्याच्या ब्राम्हणी कल्पनेला घाबरण्याचे कारण नाही. वस्तुस्थितीची दाहकता आपण डोळे मिटले म्हणून थोडीच बदलते? मुंबईमधे मराठी तरुणाकडे होणारी डोळेझाक असंख्य संस्थांतील स्टाफच्या याद्या प्रसिद्ध करून मार्मिकने अशीच वेशीवर

टांगली आणि त्याची रास्त दखल राज्य-कर्त्यांनाही नंतर घ्यावी लागली.

आज जेव्हा दलितांच्या सवलतींबाबत उगाचची कोल्हेकुई उठते आहे त्या वेळीतर जातीयवर्चस्वाची अशी प्रातिनिधिक ढळढळीत उदाहरणे डोळ्यासमोर मांडून कदाचित ह्या मतलबी प्रचाराला एका वेगळ्या थोड्याशा बोचऱ्या परंतु वास्तववादी भूमिकेवर विरोध करता येईल. नव्हे ते करणे गरजेचेच झाले आहे.

◎

## कुकावलचा शेतमजूर मेळावा

धुळे जिल्ह्यातल्या शहाद्याजवळ कुकावल या गावी शेतमजूर गरीब शेतकरी, कष्टकरी दलित जनतेचा मेळावा मोठ्या उत्साहाने पार पडला.

त्या भागातल्या कष्टकरी जनतेत काम करणाऱ्या ग्रामस्वराज्य समितीचे वतीने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता

प्रमुख पाहुणे म्हणून खादी ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष श्री शिरूभाऊ लिमये उपस्थित होते.

मेळाव्याला शिंदखेडा, शिरपूर, शहादा तालुक्यातले गावोगावचे लोक जमले होते. भगिनींची संख्या मोठी होती. सातपुड्याच्या पायथ्यापासून तो तापीच्या दोन्ही बाजूचे लोक मेळाव्याला पायी चालत आले होते. अनेकांना उन्हातून वीस मैलांवरून चालत यावे लागले होते.

मेळाव्यासमोर बोलताना शिरूभाऊ लिमये म्हणाले, " येवढ्या मोठ्या संख्येने तुम्ही लोक जमलात यामुळे मला मोठा आनंद झाला. अन्यायाविरुद्ध तुम्ही सतत झगडत राहिले पाहिजे. संघटित शक्तीच्या जोरावर तुम्ही आपले प्रश्न सोडवू शकाल. महात्मा गांधींनी त्याचा मार्ग दाखवला आहे. त्यांनी याबाबत कितीतरी प्रयोग केले आहेत. ते आपल्याला उपयोगी पडतील. सरकार किंवा बाहेरच्या कोणी येऊन तुमचे प्रश्न सोडवील या आशेवर राहू नका.

तुम्ही संघटित झाला नसता तर तुमच्या जमिनी परत मिळाल्या नसत्या, मजुरी वाढली नसती. अंबरसिंगांनी खूप काम केले. त्यांनी तुम्हाला दाखवून दिले आहे. तुमच्यातलेच नेतृत्व पुढे यायला पाहिजे. आपले प्रश्न शांततेच्या मार्गानेच सोडवले पाहिजेत. तुमची संघटना झाली आहे. आता तुम्हाला वाटेल अनेक वर्षे ज्या मालदारांनी आपल्याला दडपले त्यांना देऊया रट्टे, परंतु ती आपली चूक होईल. तुम्ही संघटित झाला आहात त्यामुळे मालदार घाबरले आहेत." पुढे त्यांनी शांततेचा मार्ग बरोबर असून हिंसेचा मार्ग चूक कसा हे विस्ताराने समजावून सांगितले.

श्री भटू पाटील यांनी सभेचे संचलन केले. श्री छायाताईंनी गावबंदी व अमलबजावणी-संबंधी ठराव मांडले. मेळाव्याचे निवेदन श्री अधिकार पाटील यांनी मांडले. भीमराव कुवर, व्रिजलाल, अहमद पठाण व गावोगावच्या ग्रामप्रतिनिधींची भाषणे झाली. आदिवासी उपयोजनेची माहिती श्री उल्हास राजज्ञांनी दिली. शेवटी श्री गोविंदराव शिंदे यांनी भाषण केले. त्यात त्यांनी आपला पुढील कार्यक्रम काय असेल ते सांगितले. मेळाव्याचे निवेदन समजावून दिले. "जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका येत आहेत. आता सगळे तुमच्याकडे धावत मते मागायला येतील, जे तुमच्या आंदोलनांत नाहीत. कधी समाजाचे काम करत नाहीत ते तुमच्याकडे येऊन सांगतील : मी तुमचा सेवक आहे मला मतं द्या. कष्टकरी जनतेसाठी जो काम करत नाही, जो व्यसनी आहे, स्वार्थी आहे, भ्रष्टाचारी आहे त्याला मत देऊ नका. आपल्यातल्याच तळमळीच्या समाजसेवकाला पारखून त्याला निवडून द्या. कोणी योग्य उमेदवार नसेल तर मतदान नाही केलेत तरी चालेल." असे ते म्हणाले.

मेळाव्यात गावोगावच्या बायांनी गाणी म्हटली. नानूभाऊ अंबोरेनीही चांगली गाणी म्हटली.

मेळाव्यात शेतमजूरांच्या मागण्यांचे खालील निवेदन तयार करण्यात आले.

(१) धुळे जिल्ह्यातील आदिवासी भागातील गरीब शेतकरी व शेतमजूर जाहीर करत आहेत की, आम्हाला मेहनत करून मानाने जगता यावे, आमचे कोणी शोषण करणार नाही. आमच्यावर अन्याय, अत्याचार होणार नाहीत असे स्वतंत्र स्वावलंबी जीवन आम्हाला जगता येईल अशी समाजरचना निर्माण व्हावी. या समाजरचनेत लोक जीवन मानवीय व लोकशाही मूल्यांनी परिपूर्ण असेल. शोषण, दडपशाही अनीती व अ... पासून मुक्त असेल. मानवाच्या व्यक्तित्व... विकासासाठी पुरेपूर संधी असेल. असा ... आम्हाला पाहिजे आहे. तो निर्माण ... साठी खालील गोष्टी तावडतोब व्हाव्या...

(१) शेत मजुराला किमान वेतन सा... मिळाले पाहिजे. अवघड व जबाबदा... कामाला दहा रुपये मिळाले पाहिजेत. मजुराला रहायला घर, जोडधंदे, म... शिक्षणाची सोय व्हायला पाहिजे. काम नसेल त्यावेळी गावातच रो... हमीतून काम दिले पाहिजे. किमान कायद्याच्या अंमलबजावणीची चांगली व्य... व्हावी.

(२) आदिवासी दलित आदी श्रम... छोट्या शेतकऱ्यांना बैलजोडी व ... मिळावीत. त्याच्या शेतीला पाण्याची ... व्हावी.

(३) शेती कसतो त्याच्याकडेच रहावी. कुटुंबाला एक बैलजोडीने कसता एवढीच जमीन ठेवावी. त्याच्यापेक्षा असलेली जमीन त्यांचेकडून काढून घे... भूमिहीन शेतमजुरांना वाटून द्यावी. संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी लो... सोपवावी.

(४) आदिवासींच्या गैर आदिवा... गेलेल्या जमिनी परत करण्यासाठी ... आहे. त्याची कडक अंमलबजावणी ... आदिवासीप्रमाणे दलितांच्या गेलेल्या ... परत मिळण्यासाठी कायदा व्हावा. आदिवासी दलितांची कर्जे माफ व्हावीत.

(५) अनेक वर्षांपासून कसत असलेल्या ... जमिनी गरीब लोकांना सहज मिळती... व्यवस्था व्हावी. त्यासाठी स्थानिक स... नेमाव्यात.

(६) आदिवासी उपयोजनेची निदा... कार्यक्षम अंमलबजावणी झाली पाहिजे

(७) दलितांप्रमाणे आदिवासींना ... देणारा कायदा पाहिजे

(८) आदिवासी भागात संपूर्ण दा... झाली पाहिजे.

(९) आश्रम शाळा दर पाच ... परिसरात असावी.

(१०) वैद्यकीय व्यवस्था गावात ... अडीअडचणी गावातच सोडवल्या जा...

(११) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ... ळ्यात सातपुड्याच्या पायथ्याशी लोकांचे फार हाल होतात, त्यासाठी परि... कारक उपाय योजावेत

(१२) सातपुड्यात जी धरणे सुच... आली आहेत ती लवकर बांधावीत...